**Signing of a MoU between Vadhvan Port Project Ltd. (VPPL) and the Directorate of Vocational Education and Training (DVET), GoM in the presence of Shri Sarbananda Sonowal, Union Minister, MoPSW**

*The Hon'ble Union Minister interacted with the students participated in Vadhvan Port Skilling Program*

**Mumbai, February 07, 2026:** Vadhvan Port Project Ltd. (VPPL), the 13th Major Port of India conducted an event to felicitate the youth of Vadhvan as a part of the Vadhvan Port Skilling Program on Saturday, February 07, 2026. The event was graced by the esteemed presence of **Shri Sarbananda Sonowal, Hon'ble Union Minister of Ports, Shipping and Waterways, Shri Vijay Kumar, IAS, Secretary, Ministry of Ports, Shipping and Waterways (MoPSW), Shri Milind Mhaiskar, IAS, Addl. Chief Secretary, Forest, GoM, and Smt. Ashwini Bhide, IAS, Addl. Chief Secretary to CM, GoM.**

The esteemed dignitaries were welcomed by **Shri Gaurav Dayal, IAS, Chairperson, JNPA, and CMD, VPPL,** in the presence of **Shri Ravish Kumar Singh, IRTS, Deputy Chairperson, JNPA.**

During the Program, Certificates were awarded to students of the second batch who successfully completed the course by the Hon'ble Union Minister. The course equips participants with comprehensive knowledge of customs processes, documentation, and procedures vital for the functioning of ports. The 4-week Custom Documentation course, comprising 100 hours of classroom training with practical exposure, equips participants with comprehensive knowledge of customs processes, documentation, and procedures essential for port operations. VPPL have also begun offering internship opportunities to Batch 1 students following the successful completion of their course.

The Hon'ble Union Minister also interacted with the students, congratulating them on their achievement and encouraging them to continue building their skills.

Further strengthening maritime skill development, confirmation letters were presented to 11 students of the GP Rating Course, conducted in collaboration with The Shipping Corporation of India (SCI). The course fee of ₹2.5 lakh per candidate is being fully borne by VPPL, underscoring the company's commitment to providing quality training opportunities at no cost to beneficiaries. Under this agreement, SCI-MTI will conduct the course – GP Rating Pre-Sea Training- for candidates sponsored by VPPL, focusing on imparting essential maritime skills and knowledge to prepare them for careers at sea. SCI-MTI has the approval from the Directorate General of Shipping to conduct, for the GP Rating Pre-Sea Training Course. The duration of the training course is six months. The training course is residential in nature. Upon successful completion of the training and qualifying the Exit Examination conducted by the Board of Examination for Seafarers Trust (BEST), a certificate shall be issued by BEST.

In another key development, a Letter of Award was handed over to Gateway Terminals India (GTI) for implementation of the Kaushalya Nirmiti Yojana Skill Development Program. Under this initiative, students from the Vadhvan region will undergo a fully residential training Program at GTI's newly developed training centre at Sheva, JNPA. The course will be conducted in batches, each batch comprising 30 students.

The Skill Development Program is designed to train youth as Container Terminal Associates across critical domains such as Health, Safety, Security and Environment (HSSE), Operations, and Engineering. The initiative aims to enhance employment opportunities for the local youth of Vadhvan Port area, while building a skilled workforce aligned with the evolving needs of the ports and logistics sector. This initiative offers a fully funded six-month training program designed to empower and upskill the youth. Students enrolled under the programme will be entitled to a stipend during the one-year apprenticeship.

The event witnessed **the signing of a Memorandum of Understanding (MoU) between Vadhvan Port Project Ltd. (VPPL) and the Directorate of Vocational Education and Training (DVET), Government of Maharashtra.**

This collaboration aims to conduct short-term skill courses at Industrial Training Institutes (ITIs) under **the Pradhan Mantri Skilling and Employability Transformation through Upgraded ITIs (PM-SETU) scheme, launched by the Hon'ble Prime Minister.** As part of this Program, students from 44 selected villages in the Vadhvan region will receive training free of cost.

As part of the initiative, VPPL has introduced a dedicated chatbot to simplify the registration process and provide real-time information about upcoming courses and opportunities. So far, the program has received an encouraging response, with over 45878 registrations from enthusiastic youth and a total of 162 batches, comprising over 6,000 students, are currently undergoing training for various courses. The skilling program encompasses 28 diverse courses, with additional options for participants to indicate their preferences for other relevant areas of training. VPPL has appointed a training partner to conduct these skilling programs.

VPPL, in the past, collaborated with various training partners and successfully conducted multiple skilling programs especially for fisherman, courses like Open Sea Cage Training through CMFRI , Fish Processing & Value Addition through CIFE. VPPL will continue conducting courses for fishermen as per the feedback received from the survey.

The initiatives reflect VPPL's steady progress in harmonising infrastructure development with community upliftment, with a strong emphasis on skills and job-oriented training.

Quotes:
*"Skill development is the backbone of India's maritime growth story and is central to the Hon'ble Prime Minister's vision of a skilled, self-reliant and future-ready India. Through initiatives like the Vadhvan Port Skilling Program, the Ministry of*

*Ports, Shipping and Waterways is following this vision by equipping local youth with globally relevant skills and meaningful employment opportunities. This integrated approach of infrastructure development and human capital creation will play a vital role in strengthening India's port-led development vision."*
**-Shri Sarbananda Sonowal, Hon'ble Union Minister of Ports, Shipping and Waterways**

"At VPPL, our vision extends beyond building a world-class port. Under the guidance of the Ministry of Ports, Shipping and Waterways, we are investing in skill development programs that cover the entire port ecosystem—right from pre sea GP Rating course to customs documentation, container terminal associates and allied maritime functions—along with support roles such as office assistants, technicians, and other essential trades. These initiatives are designed to equip local youth with industry-relevant skills, enabling them to actively participate in and benefit from the development and operations of the Vadhvan Port."

- **Shri Gaurav Dayal, IAS, Chairperson, JNPA and CMD, VPPL**

**About VPPL:**

Vadhvan Port Private Limited (VPPL) is the 13th major port of India, a special purpose vehicle (SPV) formed between Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) and the Maharashtra Maritime Board (MMB). Strategically located in Palghar district, near Dahanu, Maharashtra, VPPL is poised to be among the top 10 ports globally. The foundation stone for the port was laid on August 30th, 2024, by the Hon'ble Prime Minister of India, Shri Narendra Modi.

Committed to sustainability, VPPL will be 100% green from inception, ensuring minimal environmental impact. The port is set to enhance trade efficiency with the capacity to handle 24 million TEUs, stimulate economic growth, and contribute to regional development. Through initiatives like the Vadhvan Port Skilling Program, VPPL focuses on empowering local communities.

**Visit our website and social media to learn more:**

VPPL Website: https://vadhvanport.in/

X - VadhvanPort

Facebook - Vadhvan Port Project Ltd

Instagram - vadhvanport

LinkedIn - Vadhvan Port Project Ltd

**For media enquiries, please contact:**
Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +919920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in

**वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड आणि महाराष्ट्र शासनाच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात सामंजस्य करार केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्री मा. श्री सर्बानंद सोनोवाल यांच्या उपस्थितीत संपन्न झाला**

*यावेळी मा. केंद्रीय मंत्र्यांनी वाढवण पोर्ट कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला*

**मुंबई, 7 फेब्रुवारी 2026:** भारताच्या 13व्या प्रमुख बंदर प्रकल्प असलेल्या वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड तर्फे वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत वाढवण परिसरातील युवकांचा सत्कार करण्यासाठी शनिवारी, 7 फेब्रुवारी 2026 रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्री माननीय श्री. सर्बानंद सोनोवाल, श्री. विजय कुमार, भा. प्र. से., सचिव, बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्रालय, श्री मिलिंद म्हैसकर, भा. प्र. से., अतिरिक्त मुख्य सचिव, वन, महाराष्ट्र शासन आणि श्रीमती अश्विनी भिडे, भा. प्र. से, अतिरिक्त मुख्य सचिव, मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन, यांची मान्यवर उपस्थिती लाभली.

मान्यवर पाहुण्यांचे स्वागत श्री. गौरव दयाल, भा. प्र. से., अध्यक्ष, जेएनपीए तसेच अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड यांनी केले. यावेळी श्री. रविश कुमार सिंह, भा. रे. व. से. , उपाध्यक्ष, जेएनपीए हेही उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान, द्वितीय तुकडीतील (बॅच) अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मा. केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या

अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बंदरांच्या कार्यासाठी अत्यावश्यक असलेल्या सीमाशुल्क प्रक्रिया, दस्तऐवजीकरण व कार्यपद्धतींचे सखोल ज्ञान मिळते. ४ आठवड्यांचा (१०० तासांचा) सीमाशुल्क दस्तऐवजीकरण अभ्यासक्रम, वर्गातील प्रशिक्षणासोबत प्रत्यक्ष अनुभवाचा समावेश करून राबविण्यात आला असून, यामुळे विद्यार्थ्यांना बंदर संचालनासाठी आवश्यक असलेल्या सीमाशुल्क प्रक्रिया व कागदपत्र व्यवस्थापनाचे सर्वांगीण ज्ञान प्राप्त होते. याशिवाय, प्रथम तुकडीतील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड कडून त्यांना इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मा. केंद्रीय मंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले आणि कौशल्यविकासाचा प्रवास सातत्याने सुरू ठेवण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले.

समुद्री क्षेत्रातील कौशल्य विकास अधिक बळकट करत द शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एससीआई) यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या जीपी रेटिंग अभ्यासक्रमातील 11 विद्यार्थ्यांना नियुक्ती पुष्टीपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रति उमेदवार ₹2.5 लाख इतका अभ्यासक्रम शुल्क वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड कडून पूर्णतः वहन केला जात असून, लाभार्थ्यांवर कोणताही आर्थिक भार न टाकता दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची कंपनीची ठाम वचनबद्धता यामधून अधोरेखित होते. या कराराअंतर्गत वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड प्रायोजित उमेदवारांसाठी एससीआई - एमटीआई कडून “जीपी रेटिंग प्री-सी प्रशिक्षण अभ्यासक्रम” राबविण्यात येणार असून,

त्याद्वारे समुद्रावरील करिअरसाठी आवश्यक असलेली मूलभूत समुद्री कौशल्ये व ज्ञान प्रदान करण्यात येणार आहे. महानिदेशालय नौवहन यांची मान्यता असलेल्या एससीआई - एमटीआई  मार्फत हा अभ्यासक्रम घेतला जातो. सहा महिन्यांचा कालावधी असलेला हा प्रशिक्षण अभ्यासक्रम निवासी स्वरूपाचा आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून तसेच सीफेअरर्स ट्रस्टच्या परीक्षा मंडळ (बीईएसटी) यांच्याद्वारे घेण्यात येणारी एक्झिट परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, बीईएसटी कडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

आणखी एका महत्त्वपूर्ण घडामोडीमध्ये कौशल्य निर्मिती योजना कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी गेटवे टर्मिनल्स इंडिया (जीटीआई) यांना लेटर ऑफ अवॉर्ड प्रदान करण्यात आले. या उपक्रमांतर्गत वाढवण परिसरातील विद्यार्थ्यांना जेएनपीए, शेवा येथील जीटीआई च्या नव्याने विकसित प्रशिक्षण केंद्रात पूर्णतः निवासी स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा अभ्यासक्रम तुकड्यांमध्ये (बॅचेस) राबविण्यात येणार असून प्रत्येक तुकडीत 30 विद्यार्थ्यांचा समावेश असेल. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बंदर व लॉजिस्टिक्स क्षेत्राशी निगडित उद्योगाभिमुख कौशल्यांचे सखोल व प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळणार आहे.

हा कौशल्य विकास कार्यक्रम युवकांना कंटेनर टर्मिनल असोसिएट्स म्हणून घडविण्यासाठी तयार करण्यात आला असून, त्यामध्ये आरोग्य, सुरक्षितता, सुरक्षा व पर्यावरण (एचएसएसइ), ऑपरेशन्स तसेच अभियांत्रिकी या महत्त्वाच्या क्षेत्रांतील प्रशिक्षणाचा समावेश आहे. या उपक्रमाचा उद्देश वाढवण बंदर परिसरातील स्थानिक

युवकांच्या रोजगाराच्या संधी वाढविणे, तसेच बंदर व लॉजिस्टिक्स क्षेत्राच्या बदलत्या गरजांशी सुसंगत असा कुशल मनुष्यबळ तयार करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत पूर्णतः अर्थसहाय्यित सहा महिन्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून, तो युवकांना सक्षम व कौशल्यसंपन्न बनविण्यावर केंद्रित आहे. तसेच, या कार्यक्रमांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना एक वर्षांच्या अप्रेंटिसशिप कालावधीत मानधन (स्टायपेंड) देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड आणि महाराष्ट्र शासनाच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (डिव्हिइटी) यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. हा सामंजस्य करार श्री. गौरव दयाल, भा. प्र. से, अध्यक्ष, जेएनपीए तसेच अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड आणि डिव्हिइटी चे संचालक यांच्या हस्ते स्वाक्षरीत करण्यात आला.

या सहकार्याचा उद्देश माननीय पंतप्रधानांनी सुरू केलेल्या 'प्रधानमंत्री स्किलिंग अँड एम्प्लॉयबिलिटी ट्रान्सफॉर्मेशन थ्रू अपग्रेडेड आयटीआय (पीएम-एसइटीयू )' योजनेअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआई) येथे अल्पकालीन कौशल्य अभ्यासक्रम राबविणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत वाढवण परिसरातील निवडलेल्या ४४ गावांमधील विद्यार्थ्यांना कोणताही शुल्क न आकारता मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी तसेच आगामी अभ्यासक्रम व संधींबाबत तात्काळ माहिती देण्यासाठी वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड ने स्वतंत्र चॅटबॉट सुरू केला आहे. आतापर्यंत या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, एकूण 45, 878 युवकांनी नोंदणी केली आहे. यापैकी वाढवण परिसरातील निवडलेल्या ४४ गावांमधून 14,315 अर्ज प्राप्त झाले आहेत. सध्या 162 तुकड्यांमध्ये (बॅचेस) 6000 हून अधिक विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेत आहेत. हा कौशल्य विकास कार्यक्रम 28 विविध अभ्यासक्रमांचा समावेश करतो, तसेच सहभागी विद्यार्थ्यांना इतर संबंधित प्रशिक्षण क्षेत्रांसाठीही आपली पसंती नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कौशल्य विकास कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड ने अधिकृत प्रशिक्षण भागीदाराची नियुक्ती केली आहे.

वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड ने यापूर्वी विविध प्रशिक्षण संस्थांच्या सहकार्याने अनेक कौशल्यविकास कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविले आहेत. यामध्ये ओपन सी केज प्रशिक्षण (अभिनव जनसेवा असोसिएशन व सीएमएफआरआई), जड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण (भूपेश मोटर ड्रायव्हिंग स्कूल), संगणक सॉफ्टवेअर व हार्डवेअर (एस. व्ही. टेक्निकल इन्स्टिट्यूट, बोईसर), मासे प्रक्रिया व मूल्यवर्धन (स्नेहदीप बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था व सीआयएफइ) तसेच सीमाशुल्क मंजुरी प्रशिक्षण (स्नेहदीप बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था व बीसीबीए) यांचा समावेश आहे. सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या अभिप्रायाच्या आधारे, वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड

भविष्यातही मच्छीमारांसाठी उपयुक्त अशा प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे आयोजन सुरू ठेवणार आहे.

हे उपक्रम पायाभूत सुविधा विकास आणि स्थानिक समुदायाच्या सर्वांगीण उन्नती यांचा समतोल साधत वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड कडून होत असलेल्या सातत्यपूर्ण प्रगतीचे प्रतीक असून, कौशल्यविकास व रोजगाराभिमुख प्रशिक्षणावर असलेला ठाम भर यामधून स्पष्टपणे अधोरेखित होतो.

कोट:

“कौशल्य विकास हा भारताच्या सागरी क्षेत्रातील विकासकथेचा कणा आहे आणि माननीय पंतप्रधानांच्या कुशल, आत्मनिर्भर व भविष्यासाठी सज्ज भारत या दृष्टीकोनाचा तो केंद्रबिंदू आहे. वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमासारख्या उपक्रमांद्वारे बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्रालय स्थानिक युवकांना जागतिक स्तरावरील कौशल्ये व अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत या दृष्टीकोनाची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. पायाभूत सुविधा विकास आणि मानवी भांडवल निर्मितीचा हा एकात्मिक दृष्टिकोन भारताच्या बंदर-आधारित विकास दृष्टीकोनाला अधिक बळकटी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.”

— श्री. सर्बानंद सोनोवाल,

माननीय केंद्रीय मंत्री, बंदरे, नौवहन व जलमार्ग

"वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड मध्ये आमची दृष्टी केवळ जागतिक दर्जाचे बंदर उभारण्यापुरती मर्यादित नाही. केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली, आम्ही संपूर्ण बंदर परिसंस्थेचा समावेश असलेल्या कौशल्यविकास कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करत आहोत—यामध्ये सीमाशुल्क दस्तऐवजीकरण, जीपी रेटिंग, कंटेनर टर्मिनल संचालन तसेच इतर सागरी सहाय्यक सेवा यांचा समावेश आहे. यासोबतच कार्यालयीन सहाय्यक, तंत्रज्ञ आणि इतर आवश्यक कौशल्याधारित व्यवसायांसाठीही प्रशिक्षण दिले जात आहे. या उपक्रमांचा उद्‌देश स्थानिक युवकांना उद्‌योगाशी सुसंगत कौशल्ये प्रदान करून त्यांना वाढवण बंदराच्या विकास व कार्यप्रणालीत सक्रिय सहभाग घेण्यास आणि त्याचा लाभार्थी होण्यास सक्षम करणे हा आहे."

— श्री गौरव दयाल, भा. प्र. से, अध्यक्ष, जेएनपीए आणि सीएमडी, व्हीपीपीएल

**पीपीएल** बद्दल:

वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (VPPL) हे देशाचे १३वे मोठे बंदर असून, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड (MMB) यांच्या संयुक्त भागीदारीत स्थापन करण्यात आलेले एक विशेष उददिष्ट असलेले कंपनी रूपातील उपक्रम आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळ वसलेले हे बंदर जागतिक स्तरावर आघाडीच्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवण्यास सक्षम आहे. ३० ऑगस्ट २०२४ रोजी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या बंदराच्या भूमिपूजनाचा ऐतिहासिक क्षण घडला.

निसर्गपूरकतेला प्राधान्य देत, वाढवण बंदर हे शंभर टक्के हरित तत्त्वावर आधारित असणार आहे, जे पर्यावरणावर कमीत कमी परिणाम करत अधिक कार्यक्षमतेने काम करेल. २४ दशलक्ष टीईयू (TEU) माल हाताळण्याची क्षमता असलेले हे बंदर देशाच्या

व्यापार कार्यक्षमतेला गती देणार आहे. या माध्यमातून आर्थिक प्रगतीला चालना मिळेल आणि परिसराचा सर्वांगीण विकास होईल. वाढवण पोर्ट कौशल्य कार्यक्रमांसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक समुदाय सशक्त करण्यावर वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड विशेष भर देत आहे.

**अधिक जाणून घेण्यासाठी आमच्या संकेतस्थळावर आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

**व्हीपीपीएल संकेतस्थळ -** https://vadhvanport.in/

**फेसबुक -** Vadhvan Port Project Ltd

**X-** VadhvanPort

**इंस्टाग्राम -** vadhvanport

**लिंक्डइन -** Vadhvan Port Project Ltd

**माध्यम प्रतिनिधींनी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:**

अंबिका सिंग,

वरिष्ठ व्यवस्थापक (मार्केटिंग), जेएनपीए

मोबाईल क्र. : +919920372677

ईमेल: ambikasingh@inport.gov.in